नि.फौ.ख.क्र. २३९/२०२५
सरकार-वि- पंढरी व इतर
निशाणी क्र. ७३

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०८ यांची साक्ष.**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**नाव** - देवेंद्र रंगराव कुंभरे

**वय** - २५ वर्ष, **व्यवसाय** - मजुरी

**पत्ता** - टेकाडी, ता. सावनेर, जि. नागपूर.

**सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. एच.ए. डेकाटे यांच्यामार्फत.**

दि. १४.०३.२०२५ रोजी मी वन विभागात हंगामी वन मजदूर म्हणून कामाला होतो. त्यादिवशी वन रक्षक शेलार यांना फोन आला की सिरोंजीला भनगळा नाल्यावर या. मी, दयारामजी भलावी व सर्व वन अधिकारी सिरोंजीला गेलो. तिथे एक नर वाघ मृत अवस्थेत आढळला. त्याचे ४ पंजे, ४ दात व मिश्या नव्हत्या. साईडच्या शेतामध्ये ११ के.व्ही.च्या लाईनच्या खाली सेंट्रींग तार आढळले. त्यापुढे ५० खुंटया मिळाल्या. एक खुंटी ५० से.मी.ची होती. त्यानंतर एक तारेचे बंडल मिळाले. वाघाचे वय अंदाजे साडे तीन वर्ष होते. वाघ भु-या रंगाचा होता व त्यावर काळे पट्या होत्या. माझ्यासमक्ष वन अधिकारी, पोलीस व श्वान पथकाने पहाणी केली. दुपारी ३.०० ते ३.३० च्या सुमारास पशु वैद्यकीय अधिकारी आले. त्यांनी पोस्टामार्टम केले. त्यानंतर वाघाचे सायंकाळी दहन केले. वाघाच्या कानापासून ते शेपटापर्यंत लांबी २९० से.मी. होती. माझ्या समक्ष शेलार यांनी मोक्का पंचनामा केला. आम्ही वन अधिका-यांसोबत आजूबाजूला फिरलो तेव्हा एक शेकोटी आढळून आली. तिथून तार व खुंटया जप्त केल्या होत्या. त्या मला दाखवल्यास मी ओळखू शकतो. ते त्याच आहेत. ते तार एम.ओ.क्र. १ वर आहे व खुंटया एम.ओ.क्र.२ वर आहे. मी आरोपींना ओळखत नाही.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्रीमती. जे.एच.शेंडे यांचेमार्फत**

**२.** गंगावने यांनी माझे बयाण नोंदवले नाही. शेलार यांचा नंबर मला पाठ नाही. मी गंगावने यांना माझे आधारकार्ड चार्जशिटमध्ये दाखल करण्याकरिता दिले नाही. हे म्हणणे

खरे आहे की, मी मृत वाघाला हात लावला नाही. सेट्रींग तारची लांबी मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वत: खुंटया मोजल्या नाही. खुंटया ५० से.मी.च्या आहेत हे मी माझ्या अंदाजाने सांगितले. घटनास्थळी एकच तारेचे बंडल मिळाले. हे म्हणणे खरे नाही की, वाघाचे वय साडे तीन वर्ष आहे, ही माहिती गंगावने यांनी दिली. हे म्हणणे खरे आहे की, सिरोंजी येथे हळदीच्या रंगाचे काळे पट्टेवाले वाघ आढळतात. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी भु-या रंगाचा वाघ नव्हता. वाघाच्या अंगावरती किती काळे पट्टे होते हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, '*माझ्यासमक्ष वन अधिकारी, पोलीस व श्वान पथकाने पहाणी केली, दुपारी ३.०० ते ३.३० च्या सुमारास पशु वैद्यकीय अधिकारी आले, त्यांनी पोस्टामार्टम केले. त्यानंतर वाघाचे सायंकाळी दहन केले, वाघाच्या कानापासून ते शेपटापर्यंत लांबी २९० से.मी. होती'*, हे मी खोटे सांगत आहे. मोक्का पंचनामा दुपारी ३.०० च्या दरम्यान सुरू झाला व ४.०० वाजताच्या दरम्यान संपला. वन अधिकारी सोडून अमोल तुकाराम धुर्वे व अंकुश संपत परतेकी यांनी सहया केल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी शेकोटी आढळली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाघाची पायाची लांबी, पोटाचा घेर व इत्यादी मोजमाप मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाचे लॅटीटूड व लॉन्जीटूड मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
समक्ष,

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2026.03.25 17:13:41 +0530

सावनेर,
दिनांक २५.०३.२०२६

(एस. एम. गाडे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

नि.फौ.ख.क्र. २३९/२०२५
सरकार-वि- पंढरी व इतर
निशाणी क्र. ७३

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- D. R. Aglawe